नि.फौ.ख.क्र. १४५/२०२२
मंजू / चंपतलाल
नि.क्र. ३५

**<u>दोषारोप पूर्वीचा पुरावा</u>**

**<u>फिर्यादी तर्फे साक्षीदार क्र. ३</u>**

नांव : रेवादास धनराज लिल्हारे
वय : ४० वर्षे, कामधंदाः मजुरी
राहणार : सिंगोला, ता.लांजी, जि.बालाघाट

**<u>सरतपास फिर्यादीतर्फे विधीज्ञ श्री आर.डी. लिल्हारे यांच्या मार्फत शपथेवर सुरु</u>**

१. मी फिर्यादी व आरोपीला ओळखतो. माझ्या समक्ष फिर्यादीने आरोपीला १३० ग्रम चे लगड दिली होती. त्या संदर्भात आरोपी व फिर्यादी यांच्या मध्ये करारनामा झाला होता. मी त्यावेळी हजर होतो. आता मला सदरचा नि.क्र. ३२ वरील करारनामा दाखविला. त्यावर माझी स्वाक्षरी आहे. तसेच त्यावर साक्षदार तरुन टेंभरे यांची स्वाक्षरी आहे. तसेच आरोपी व फिर्यादी यांची स्वाक्षरी आहे. करारनाम्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. आरोपीने मान्य केल्याप्रमाणे दागिणे तयार करुन दिलेले नाहीत. पोलीसांनी माझा जवाब घेतला होता.

**सरतपास पुर्ण**

**उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्रीमती एम.के. बहेकार यांचे मार्फत -**

आरोपीतर्फे विधीज्ञ यांनी विनंती करुन उलटतपास राखून ठेवण्यास सांगितले. सबब उलटतपास राखून ठेवण्यात येतो.

**श्रवणोत्तर स्वीकृत**

**आमगांव** **(समीर गोपाळ गुणारी)**
**दिनांक : २०/०१/२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, आमगांव.**